अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– १९/०९/२०२५

## —: प्रेसनोट :—

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २८/२०२५ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| अटक आरोपी लोकसेवक | श्री. सुरेश मारूती सुरकुले, कनिष्ठ पर्यवेक्षक, घनकचरा व्यवस्थापन, एल वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. १५,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. ८,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे हलालखोर (कामगार) म्हणून एल वार्ड, घनकचरा व्यवस्थापन, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई येथे साफसफाईचे काम करतात. तक्रारदार यांना कंबददुखीचा त्रास आहे. सदरबाबत तक्रारदार हे नायर रूग्णालय येथे उपचार घेत असून डॉक्टरांनी त्यांना ऑपरेशन करण्याचा सल्ला दिलेला आहे. त्यानुसार तक्रारदार यांनी दिनांक १६/०९/२०२५ रोजी एल वॉर्ड येथील कनिष्ठ पर्यवेक्षक लोकसेवक श्री. सुरेश मारूती सुरकुले यांची भेट घेवून त्यांना पाठदुखीचा त्रास असल्याने त्यांचेसोबत दुसरा एक कामगार देण्याबाबत व फिक्स रोड देण्याबाबत विनंती केली. नमूदवेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना सांगितले की, दर महिन्याला रू. ७,०००/- दे आणि घरी बसून नोकरी कर किंवा एकदाच रू.१५,०००/- दे आणि फिक्स रोड घे असे सांगून लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १९/०९/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १९/०९/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामाकरीता रू. ८,०००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक सुरेश मारूती सुरकुले यांना तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम रू. ८,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्री अजित सुळे, सहाय्यक पोलीस आयुक्त** **पर्यवेक्षक अधिकारी :- श्री मोहन जगदाळे, पोलीस निरीक्षक**

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**
**व्हॉट्सअप क्र. :– 8828241064** **मोबाईल ॲप :– www.acbmaharashtra.net**
**वेबसाईट :– acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**
**ईमेल :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**फेसबुक :– www.facebook.com - Maharashtra ACB**